INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# D.P. Bhosale College, Koregaon

Tal. Koregaon, Dist. Satara (MS), INDIA
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
NAAC Re-accredited 'A' Grade (CGPA 3.12)
ISO 9001:2015 Certified

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March -2019 Special Issue – 171 (C)




आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद स्मरणिका

## भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब

अतिथी संपादक
डॉ.व्ही. एस. सावंत
प्राचार्य
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

कार्यकारी संपादक
डॉ. बी. एस. चव्हाण
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

सहयोगी संपादक
श्रीमती एम. एम. देठे
डॉ. व्ही. व्ही. नावडकर

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर (येवला)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

काशीकापडी, भैराळ, कोल्हाटी, ममणजोगी, पांगुळ, रावळ, शिकलगार, ठाकर, वैदु, वासुदेव, गोंड, बहुरूपी, ठेलारी, ओतारी, धनगर, वंजारी, मरीआईवाले (कडकलक्ष्मी), गहिरा, गुंगूवाले, डवळा नंदीवाले इत्यादींना भटक्या जमातीमध्ये समावेश करण्यात आला आहे. इत्यादींच्या अंतरंगाचा, त्यांच्या मौखिक साहित्याचा, त्यांची संस्कृती, त्यांची जात पंचायत-महाजात पंचायत, समाज जीवन, त्यांची उदर निर्वाहाची साधने, त्यांचे कला प्रकार व स्वरूप, त्यांच्या दंत कथा, त्यांची देव-दैवते, सण- उत्सव, मातृकुटुंब पध्दत, त्यांची बोली व सांकेतिक भाषा, त्यांची विवाह पध्दत, अंत्यविधी पध्दत, पोषाख, राहणीमान, त्यांच्या समस्या, त्यांची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी तसेच या जाती-जमातींच्या लेखकानी लिहिलेले साहित्य इत्यादींना मराठी विषयाबरोबरच अन्य विषयांच्या संशोधकांना, अभ्यासकांना, विदयार्थ्यांना वाङ्मयीन अंगाने अभ्यासता यावेत. मराठी साहित्य प्रवाहात भटक्या- विमुक्त साहित्याचे असलेले स्थान स्पष्ट होण्याच्या दृष्टीने व त्या प्रवाहाला बळकटी मिळण्याच्या उद्देशाने 'भटक्या विमुक्तींची श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब' हा विषय आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निवडण्यात आला आहे. या परिषदेसाठी अभ्यासकांनी व प्राध्यापकांनी 232 शोधनिबंध पाठवून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे.

आम्हा रयत परिवारांचे आधारस्तंभ व मागदर्शक म्हणजे आमच्या रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषी मंत्री मा. शरदचंद्रजी पवार साहेब, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. प्रा. डॉ. एन. डी. पाटील, मा. रामशेठ ठाकूर, चेअरमन. मा. डॉ. अनिल पाटील, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. आ. डॉ. विश्वजित कदम, सदस्य, प्राचार्य एस. के. पाटील, ज्ञानदेव भोसले, श्रीरंग भोसले आदी मान्यवर होय. या बद्दल सर्वांचे आम्ही आभारी आहोत. महाविद्यालयाचे मार्गदर्शक व स्फूर्तीस्थान असलेले रयत शिक्षण संस्थेचे सचिव मा. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव मा. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, ऑडीटर मा. प्राचार्य डॉ. अरुण आंधळे यांचेही मन:पूर्वक आभार.

आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून रोमानियाच्या एलिना इस्टॉक तर बीजभाषक म्हणून महाराष्ट्र राज्य भटके- विमुक्त आयोगाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. सुवर्णा रावळ तसेच परिषदेसाठी तज्ज्ञ संशोधक साधन व्यक्ती म्हणून Marzia Federici (Italy), Marinia Gabreaanu, Emilia Heine, Ritu Sinha, Laura Ghershel, Alina Istioc, Claudia Marc Marcele Rotatu (Romaniya) Tim Bruce (England) Natalia Condurache (Rashiya), Dr. Anupkumar Raskar (India), Dr. Sanjay Kadam (Tibet) इ. मान्यवर उपस्थित होते. यांचेही आभार.

परिषद यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले यावद्दल आम्ही त्यांचे मन:पूर्वक आभारी आहोत. एक्स - डीपीयन्स असोसिएशन, आमचे सहकारी प्रा. मीरा देठे, डॉ विद्या नावडकर, डॉ. सतिश सायकर, प्रा. राबन मुल्ला, प्रा. फुलचंद शिरसाट, प्रा. सुधीर कसगावडे, प्रा. बाळकृष्ण भोसले, डॉ. सुनिल जाधव, प्रा. साधू कोळेकर, प्रा. चंद्रकांत जावळे, प्रा. केतन जाधव, कार्यालयीन अधिक्षक विद्याधर कांबळे, जफर मणेर, युवराज मिसाळ, प्रसाद रसाळ, सुधाकर गायकवाड, धनाजी माने, प्रियांक तारळकर, अनिल चव्हाण, विविध वृत्तपत्रांचे पत्रकार, वृत्त वाहिनींचे प्रतिनिधी, रिसर्च जर्नीचे संपादक डॉ. धनराज धनगर, भटक्या- विमुक्तांची लोकधारा या कार्यक्रमातील सहभागी कलावंत, विविध देश - विदेशातील महाविद्यालयातून आलेले प्राध्यापक, शाखा प्रमुख व एकूणच या परिषदेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व ज्ञात – अज्ञात व्यक्तींचे मनापासून आभारी आहोत.

डॉ. बाळासाहेब चव्हाण
समन्वयक
आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | भटके आणि विमुक्त समाज : सर्वांगीण आयामांचे विचारमंथन | डॉ.सुवर्णा रावळ | 09 |
| 2 | 'बिराड' आत्मकथनातून आलेले बेलदारेत्तर भटक्या समाजाचे चित्रण | डॉ.प्रमोद गारोडे | 13 |
| 3 | नंदीवाले समाजातील जातपंचायत व महाजात पंचायत | डॉ.दत्ता पाटील | 25 |
| 4 | देशीवाद आणि दलित कविता | डॉ.पांडुरंग गायकवाड | 28 |
| 5 | भटक्या – विमुक्त गोंधळी समाजाचा अभ्यास | श्री.विलास देऊलकर | 35 |
| 6 | आदिवासी भटके यांची आत्मकथने | डॉ. शोभा रोकडे | 40 |
| 7 | भुजंग मेश्राम यांच्या काव्यातील वंचितांचे जीवनदर्शन | प्रा. संजय मेस्त्री | 45 |
| 8 | विमुक्त भटक्या जमाती : स्त्रियांच्या समस्या | प्रा. प्रदिप होडावडेकर | 51 |
| 9 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्रीजीवनाचे चित्रण | डॉ. अलका मटकर | 55 |
| 10 | 'गोठण'मधील गोर बंजारा संस्कृती | डॉ.गिरीश मोरे | 59 |
| 11 | भटक्या-विमुक्तांची ऐतिहासिक सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी | प्रा.वामन गावडे | 63 |
| 12 | भटक्या विमुक्तांच्यातील विवाह पद्धती (निवडक जातींच्या अनुषंगाने -गोसावी, नंदीवाले, फासेपारधी) | डॉ. नितीश सावंत | 67 |
| 13 | भटक्या विमुक्तांच्या कलाप्रकारांचे स्वरूप | डॉ. एन. डी. कार्वेकर | 72 |
| 14 | भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | डॉ. सौ. वंदना नढे | 76 |
| 15 | कैकाडी समाज आणि संस्कृती | डॉ. मिलिंद वाव्हळे | 80 |
| 16 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील सामाजिक दु:ख | पूजा कदम व आण्णासाहेब सोनवणे | 89 |
| 17 | भटक्या विमुक्त जमातींचे स्वरूप व वैशिष्ट्ये | प्रा.अभिमन्यू ओहळ | 92 |
| 18 | वंजारी समाजाचे अंतरंग | डॉ. अनिल बांगर | 96 |
| 19 | 'चिनी मातीतील दिवस' या प्रवासवर्णनातील सामाजिकता | प्रा.धनाजी उर्फ धनंजय भिसे | 101 |
| 20 | भटक्या समाजाचे साहित्यातील चित्रण | प्रा. आर. डी. शिंदे | 109 |
| 21 | भटक्या विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | डॉ. सुधाकर बोथीकर | 113 |
| 22 | राजर्षी शाहू महाराज यांनी भटक्या-विमुक्त जमातीच्या उद्धारासाठी केलेले सामाजिक कार्य | प्रा. अजितकुमार पाटील | 120 |
| 23 | 'फेसाटी'तील वंचिताच्या शिक्षण प्रवासाचा शोध | डॉ. आनंद वारके | 127 |
| 24 | पशुपालक भटक्या जमाती : समाज आणि संस्कृती | डॉ. हिराचंद्र मोरे | 133 |
| 25 | भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | डॉ. मीनाक्षी देव | 137 |
| 26 | कोल्हाट्याचे पोर-स्वरूप व विशेष | डॉ. नंदिनी रणखांबे | 141 |
| 27 | फँड्री : एक समाज वास्तवदर्शी चित्रण | अरुणा गायकवाड | 144 |
| 28 | भटक्या विमुक्तांच्या कादंबरीतील स्त्री जीवन | आशा घोडके | 148 |
| 29 | भटक्या जमातीची व्यथा मांडणारी आत्मकथने | ज्ञानेश्वर कदम | 153 |
| 30 | बंजारा समाज : साहित्य आणि संस्कृती | डॉ. राजेश धनजकर | 156 |
| 31 | भटक्या विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | डॉ. राजेंद्र बावळे | 161 |
| 32 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील सामाजिक व सांस्कृतिक स्थिती | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 165 |
| 33 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील समाज व अंधश्रद्धा | प्रा. बाळकृष्ण भोसले | 169 |
| 34 | 'बहादूर थापा आणि इतर कविता' : वंचित समूहाचे चित्रण | डॉ. उमेश सिरसट | 173 |
| 35 | 'भटके –विमुक्त' – संकल्पना स्वरूप व व्याप्ती | डॉ. विद्या नावडकर | 177 |

# वंजारी समाजाचे अंतरंग

डॉ. अनिल बांगर
(मराठी विभाग प्रमुख)
को.ए.सो.लक्ष्मी-शालिनी
महिला कॉलेज- पेझारी
ता. अलिबाग.जि.रायगड.
भ्रमणध्वनी.९०२८०१२१११

**प्रास्ताविक:**

वंजारी ही प्राचीन काळात बैलाच्या साहाय्याने व्यापार करणारा समाज म्हणून या समाजाची ओळख होती.त्या काळी वनचारी म्हणून तो ओळखला जाई.वनचारी वरून वंजारी हा शब्द रूढ झाला.आणि याच नावाने आता हा समाज ओळखला जातो.हया समाजात प्रामुख्याने क्षत्रिय व वैश्य असे दोन प्रकार होते.थोडस इतिहासात जाऊन पाहिलं तर वंजारी समारातील लोक महाराणा प्रताप यांच्या सैन्यात मोठया प्रमाणात होते. महाराणा प्रताप यांचे सरदार भल्ला व फत्ता हे वंजारी समाजाचे होते.१४ व्या शतकाच्या शेवटी व १५ व्या शतकाच्या सुरूवातीला भारतात भीषण दुष्काळ पडलेला होता या काळात वंजारी समाजातील दुग्रादेवी या महिलेने नेपाळ, ब्रम्हदेश व चीनमधून धान्य आणून येथील लोकांना पुरविले, यामुळे येथील हजारो लाखो नागरिकाचे प्राण वाचले.

वंजारी समाजाचा इतिहास फार जुना असून तो मनोरंजक व रोचकही आहे'डॉ.प्रताप चाटे यांच्या शोध निबंधात ते म्हणतात 'वंजारी/बंजारा समाजाचा उल्लेख सिंधू संस्कृतीत असून त्याकाळी देखील वंजारी/बंजारा बैलांच्या पाठीवर अन्नधान्य लादून व्यापार करत असे.तेव्हाही त्यांचे जीवन भटके होते.तांडेच्या तांडे एका गावाहून दुसऱ्या गावाकडे जात.ही भटकंती त्यांना रानावनांतून दऱ्याखोऱ्यातून ,साहजिकच त्यांना रानावनांत तंबू टाकून वस्ती करावी लागे.'वंजारी म्हणजे वनात राहणारे लोक म्हणून ओळखले जातात.

मूळचा राजस्थानचा असलेला हा वंजारी समाज कालांतराने महाराष्ट्रासह,गुजरात ,मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, हरयाणा ,पंजाब व गोव्यात स्थलांतरित झाला.महाराष्ट्रात आलेला वंजारी समाज पालघर, ठाणे, नाशिक, धुळे, बुलढाणा, बीड, उस्मानाबाद ,लातूर, परभणी ,नांदेड, जालना ,औरंगाबाद, सोलापूर, सातारा, सांगली ,कोल्हापूर या परिसरात मोठया संख्येने स्थायिक झाला.काळ पुढे सरकला तशी वंजारी समाजाची ओळखही बदलत गेली राजकारण, प्रशासन,शिक्षण,आरोग्य, कायदा,कला, क्रीडा, प्रसिध्दीमाध्यम,उद्योगव्यवसाय आदी अनेक क्षेत्रात हा समाज आपली ओळख निर्माण करू पाहतो आहे.वंजारी समाजात वारकरी संप्रदायाचे संस्कार प्रकर्षाने आढळतात.संत भगवानबाबा,वामनभाऊ यासारखे महान संत होऊन गेले त्यांनी सर्व जातीधर्मांच्या लोकांना नवी दिशा देण्याबरोबरच समाज घडवण्याचे महान कार्य केले.वंजारी समाजात सहिष्णुता,समता,बंधुता,प्रेम, माणुसकी इतर समाजाबद्दल आदर अशी सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये प्रकर्षाने दिसून येतात.वंजारी समाजाविषयी असे म्हटले जाते की,'वंजारी समाज कुठेही गेला तरी आपला ठसा उमटल्याशिवाय राहत नाही.'महाराष्ट्रात वंजारी समाजाच्या चार शाखांचा उल्लेख आहे

उत्पत्ती

वंजारी समाजाची उत्पत्ती ही रेणुका देवीच्या सन्तानीपासून झाली असे मानल्या जाते.रेणुका माता आणि जमदग्नी ऋषी यांना पाच पुत्र होते.त्यापैकी वशुमंत,वशुमंतापासून कमण्डक ऋषींना अनुक्रमे रघुपती, अधिपती,कानुपती आणि सुभानुपती हे पुत्र झाले यातील रघुपतीपासून १)गवर्जीन,अधिपती पासून २)लाडजीन, कानिपती पासून ३)मथुरजन आणि सुभानपती पासून ४)शेंगाडा अशा क्रमवार चार शाखांची उत्पत्ती झाली. आज या चार शाखा एक आहेत व वंजारी म्हणून परिचित आहेत..१) लाड वंजारी,२) मथुरी वंजारी,३)गवर्जीन वंजारी,४) शेंगाडा वंजारी.पालघर जिल्हयातील वंजारी मात्र फक्त मथुरी वंजारी म्हणून ओळखले जातात.

व्यवसाय/उद्योगधंदे

भटके जीवन जगणारा ,सैन्याला रसद पुरवणारा हा समाज होता.महाराष्ट्राच्या वसाहतीचा अभ्यास करता हा समाज अर्थात शेकडो वर्षापूर्वी स्थिरावला.सर्वच समाजाची स्थिरावण्याची प्रक्रिया म्हणजे शेतीव्यवसाय.अर्थात कृषी संस्कृतीचा उदय.उशिरा स्थिरावण्यामुळे या समाजाच्या वाटयाला आधीच अधिग्रहित झालेली सुपीक जमीन आली नाही,तर अगदी शेवटची, डोंगरालगतची जमीन आली.म्हणून आजही या समाजाचं मूळ डोंगरालगत आढळतं.अत्यंत कष्टाळू असा हा डोंगरी समाज केवळ मेहनतीच्या जोरावर गंगथडीकडे सरकू लागला.अन पुढच्या टप्प्यात हळूहळू शिक्षण घेऊन शहराकडे विविध क्षेत्रांत पोहचला.ठाणे, पालघर, नाशिक,धुळे,बुलढाणा,औरंगाबाद,यवतमाळ,अहमदनगर,जिल्हयात आढळणारा हा समाज प्रामुख्याने बीड जिल्हयात ऊसतोड कामगार म्हणून मोठया संख्येने आढळतो.महाराष्ट्रात स्थिरावताना महाराष्ट्राच्या दैवताला म्हणजे पंढरपूरच्या विठ्ठलाला आपलं मानून वारक—यांच्या भक्तिसंप्रदायात सामील होत गेला.संत परंपरेची मानवतेची शिकवण अंगीकारत गेला. अहमदनगर जिल्हयातील भगवानगड हे वंजारी समाजाचे श्रध्दास्थान आहे.

पोशाख

पूर्वी पुरूष जाडे भरडे कपडे—पागोटे, कफणीवजा वंडी,धोतर गुडघ्यापर्यंत नेसत.स्त्रिया पूर्वी गुडघ्यापर्यंत लुगडी नेसत.डोक्यावर पदर घेत आणि अंगात काचोळी ( कासळी ) घालत.अगदी प्राचीन काळापासून स्त्रियांना दागिन्यांची हौस दिसून येते.आजही तो रिवाज आहे.

आहार

प्राचीन काळी हा समाज मांसाहारी होता.गुजरात राज्यातील निवास स्थनापासून तो पूर्ण शाकाहारी झाला. वारकरी संप्रदायाचे संस्कार या समाजावर झाले असल्यामुळे बहुतांश पुरूष मंडळी माळकरी आढळतात.या समाजातील स्त्रिया शाकाहारी आहेत.विविध प्रकारच्या डाळी—पालेभाज्यांचा वापर आहारात होतो.

वंजारी बोलीभाषा

वंजारी समाज हा भटका असल्यामुळे ,जेथे जेथे काही काळ स्थिरावले, तेथील बोलीभाषांचा परिणाम वंजारी बोलीभाषेवर झाला.अनेक बोलींची मिश्रण असलेली ही बोली आहे तीत गुजराती बोलीभाषा,राजस्थानी, भोजपुरी बोलीभाषा,महाराष्ट्रीय बोलीभाषा अशा सर्व बोलीभाषांचे मिश्रण पूर्वीच्या वंजारी बोलीभाषेवर होऊन,ती क्लिस्ट/किचकट बनली आहे.त्या ठसक्यात आणि त्या ठेक्यात बोलली गेली तर तिच्यात कठोरपणा, उद्दामपणा जाणवतो. पण प्रत्याक्ष वागणुकीत मात्र तसे जाणवत नाही.ती समोरच्याला लळा लावल्याशिवाय राहत नाही.

पूर्वी वंजारी समाज हा भटका होता बैलाच्या पाठीवर धान्याच्या गोणी लादून ते सतत भटकंती करीत. बैलाचे तांडेच्या तांडे बरोबर घेऊन वेगवेगळया प्रदेशांत,धंदापाणी करत हा समाज फिरे. त्यामुळे कधी मैदानी प्रदेशात,कधी डोंगरदऱ्यांतून ,तर कधी पठारी प्रदेशांतून त्यांचा प्रवास होई.जिथे जितका काळ धंदा चाले,तोवर त्या प्रदेशात ते मुक्काम करीत.साहजिकच तेथील समाजजीवन,चालीरीती आणि तिथल्या सांस्कृतिक जीवनाचा परिणाम या भटक्या समाजावरही होत असे.परिणामी तेथील स्थानिक भाषेतील नवीन शब्दांची वंजारी बोलीत भर पडत गेली.सततच्या भटकंतीमुळे या समाजाला खास वैशिष्टयपूर्ण असे सांस्कृतिक जीवन व प्रगत अशी भाषा लाभली नाही.समाजाची बोलीभाषा वंजारी बोलीच आहे.यासंदर्भात वंजारी बोलीतील कांही नमुनेदार उदाहरणे पाहिली तर वेगवेगळया बोलीभाषांतील गीत तीत कशी आली आहेत, ते चटकन लक्षात येईल.

**गुजराती प्रचुर गीत**

'उतरो उतरो सोनल बाय बिंगी |पेटये दागिना,किटय गियो
अरगणिये,साडयो कोहबाय गियो |उतरो उतरो सोनल बिंगी'.

**मराठी प्रचुर गीत**

'अळद लाविती सौरंगी | कोण बापाचा लाडकला
कोण आयसी लाडकली | अळद लावीतो सौरंगी'.

**गुजरातीचा प्रभाव**

'गरबो खुंदा यो रे ,खुंदाओ | कोण गामे खंदाओ
गरबो खुंदा,यो रे ,खुंदायो | दापोली गामे खुंदाओ'.

या बोलीचे वैशिष्टय हे की,अनेक बोलीभाषांचे बेमालूम मिश्रण तिच्यामध्ये झाले आहे.त्यामुळे ती समजायला महाकठीण,विविध भाषांतील शब्द-संमिश्रतेमुळे वंजारी लोक अगदी मराठी,गुजराती,हिंदी, इंग्रजी या भाषा ते पटकन् अवगत करतात.वंजारी बोलीतील कांही वाक्प्रचार आणि म्हणी भाषिकदृष्टया सौंदर्यपूर्ण आहेत. कांही बोधवचनाचाही या बोलीत वापर केला जातो.याची कांही उदाहरणे पुढीलप्रमाणे-

**वाक्प्रचार**

१)नांगो माणूस नांगी वात.२)लोकोंनी नानी तानी वार्ता तू काहटी करत.
३) हाणनो किडो हाणमा नय रेतो.४) अे डह आहडतो कां फरत.

**म्हणी**

१)मुवली बेहेने हेरबरी,दुध वधारी.२) कटलो पेर धोत्यामा हंदा नांगात.
३) आहीने हेत पडत तो आही दकाटत- बाफूने हेत पडत तो बाफू दकाटत हेत.

**बोध वचन**

बोध वचनाचाही वापर करून वंजारी बोलीभाषेची रंगत वाढवली आहे–
१)कटलो तरी रडयो तो गियलो आवनो हे गा.२)राख, लगना बेरनी,हर देवानी हे गा.
वंजारी बोलीतील व्याकरण कर्ता, कर्म, क्रियापद यानुसार चालतात.
वंजारी बोलीत–गोपाळ शाळमा हिकत.
मराठीत– गोपाळ शाळेत शिकतो.

या बोलीत स्त्रीलिंगी रूप नाही.तसेच तृतीयपुरूषी अनेकवचन नाही.लिंग, वचन यांची निश्चितता नाही. अर्थात व्याकरणाशिवाय या बोलीचे कांही अडत नाही.अनेक भाषांतील शब्दांची उचलेगिरी,संस्करण झाल्यामुळे ही बोली बहुतांशी ओबडधोबड अशीच आहे.ती रसाळ नाही.मातृभाषेला वाईट म्हणू नये,पण तिचे खरे स्वरूप आपणाला मान्य करावेच लागेल.तरीही आमची वंजारी बोली आम्हांला आवडते.कारण ती आमची मातृभाषा आहे.स्वातंत्र्यानंतर हया समाजात कमालीचे चैतन्य निर्माण झाले.त्याचे कारण शिक्षण जो– तो हिरिरीने शिकू लागला. त्यातून शिक्षकीपेशा, कारकून,अधिकारीवर्ग,निर्माण झाला.आज खऱ्याअर्थाने हा समाज सुशिक्षित झाला. उच्च मध्यमवर्गाच्या तोडीला गेला.परंतु यामुळे एक झाले.सुशिक्षित मुले शिक्षण,नोकरी,उद्योग यासाठी गांव सोडून शहराकडे वळली.शेतीकडे दुर्लक्ष झाले.जुने –धंदे व्यवसाय कालबाहय झाले.त्यामुळे मातृभाषेचा लोप होत गेला.आज ही बोली दहा टक्केच बोलली जाते.तीत मराठी,इंग्रजी, हिंदी,इत्यादी भाषेचे शब्द घुसून ती आणखीनच सरमिसळ झाली आहे.या बोलीत शिवराळपणा असला तरी तो ऐकायला खमंग वाटतो.आज काळाच्या ओघात ही बोली कालबाहय होण्याच्या मार्गावर आहे.

## सांस्कृतिक जीवन

या वंजारी समाजाला स्वतंत्र असे सांस्कृतिक जीवन नाही.नेहमीच्या भटकंतीमुळे अस्थिर जीवन.त्यामुळे कला, क्रीडा,गायन, वाद्य,या गोष्टीकडे वेळ देता आला नसेल.त्यामुळे सांस्कृतिक जीवनाचा अभाव दिसून येतो. मागील तीन दशकात महाराष्ट्राच्या प्रशासनात ,समाजकारणात, राजकारणात,सांस्कृतिक आणि शैक्षणिक विश्वात वंजारी समाजाने लक्षणीय प्रगती केलेली आहे.

## लग्न,मुंज व इतर धार्मिक चालीरीती

फार पूर्वी बालविवाह होत.यात विविध प्रकारच्या चालीरीतींचा प्रभाव होता.मुलीच्या वडिलांना देज देणे,लग्नाचा खर्च वराच्या बापाने करणे.लग्नात मुलाच्या मामाने वराला घोडयावर बसवून मामसाळा काढणे,वरघोडा काढणे,वाद्यवाजंत्री घेऊन गावातील लोकांना सन्मानाने बोलावून भोजन घालणे.हळदीचा कार्यक्रम साग्रसंगीत चालतो.

## अंत्यविधी करणे

मृताच्या आत्म्याला त्रास होऊ नये,आत्मा भटकत फिरू नये म्हणून व्यक्ती मृत्यू पावल्यापासून विविध विधी करतात.दहावा,बारावा,तेरावा,तसेच एक वर्ष झाल्यानंतर श्राध्द घालून आत्म्याला मुक्त करण्याचा हा विधी पिंडदान करून करतात. लोकभोजन दिले जाते.पुरोहिताला मृताला लागणाऱ्या सर्व वस्तू दान करतात.याप्रसंगी गोदानही (गाय ) केले जाते.तशी परंपरागत आलेली ही रीत आहे.सोळा संस्कारापैकी ओटी भरणे (गर्भ संस्कार),नामकरण विधी,मुंज,मृतांचे अंत्यसंस्कार केले जातात.

धार्मिक सण,पूजाविधी

वंजारी समाज नागपंचमी,बैलपोळा,दसरा,दिपावली,होळी,रामनवमी,हनूमानजयंती,गुढीपाडवा,कृष्णाष्टमी इत्यादी उत्सव साजरे करून,देवदेवतांची पूजाही केली जाते.आजही मोठया आनंदाने हे उत्सव या समाजात साजरे केले जातात.धर्मिक चालीरीती परंपरागत समाजात चालू आहेत.मूर्ती पूजा केली जाते.उपवास केले जातात. धार्मिक विधीच्या वेळी मांसाहार वर्ज्य असतो. हिंदू धर्मातील सर्व सण समारंभ यथासांग करण्याची रीत या समाजात प्रचलित आहे.खेडयापाडयात,वंजारी समाजाच्या घराघरांत देवादिकांच्या फोटो सोबत दोन फोटो आवर्जून आढळतात.एक संत भगवानबाबा आणि गोपीनाथ मुंडे यांचा फोटो असतो.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

समाजातील सामाजिक राजकारणी

'कोणत्याही भूमीत रूजावे | अशक्य ते शक्य करून दाखवावे

स्वाभिमानाने कुठेही जगावे | ही ती वंजाऱ्याची खासियत'.

'आपल्या वंजारी समाजाला कुठलंही संख्याबळ नाही.राजकीय पार्श्वभूमी नाही.बुध्दी आणि मेहनत हेच आपलं मेरीट'.असे गोपीनाथराव मुंडे सांगत असत. महाराष्ट्राबाहेर देशात फिरताना महाराष्ट्राच्या संतपरंपरेने, शाहू-फुले- आंबेडकरांच्या पुरोगामी विचाराचे ,महाराष्ट्राचे मंथन करताना राजकीय नेतृत्वावर चर्चा होते. तेव्हा राज्याबाहेरील लोकांना केवळ शरद पवार,आणि गोपीनाथ मुंडे यांची ओळख असते.महाराष्ट्राच्या ग्रामीण परिस्थितीचा अभ्यास असणारे,या भागातील लोकांची नस अन् नस ओळखणारे,प्रत्येक गाव–तांडा –तालुक्याची जाण असणारे यशवंतराव चव्हाण,शरद पवार, गोपीनाथ मुंडे असे तीनच नेते महाराष्ट्रात झाले.

भारतीय जनता पक्षाला बहुजन समाजात स्थान मिळवून देण्याचे कार्य गोपीनाथराव मुंडे यांनी महाराष्ट्रात केले.ते भाजपातील बहुजनांचा चेहराच होते.अत्यंत गरीब, कष्टकरी आणि अल्पसंख्य अशा वंजारी समाजातील या नेत्याने प्रस्थापित जातिव्यवस्थेला संघर्षमय छेद दिला आणि आपले नेतृत्व सिध्द केले.मराठवाडा विकास आंदोलन असो,नामांतर चळवळीत नेटाने सहभाग घेतला आणि आमचा गणपती दूध पीत नाही असे ठणकावून सांगणारे गोपीनाथराव मुंडेच होते.मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीसाठी त्यांनी लढा दिला.इतकेच नव्हे तर मुस्लीम तरूणांवरील दंगलीचे खटले मागे घेतले.त्यांचे कार्य तथाकथित हिंदुत्ववादी कल्पनेला छेद देणारेच होते. धर्मभावनेपेक्षा वास्तववादी प्रश्नांची जाण आणि भान त्यांच्याकडे होतं.स्व.गणपत पांडुरंग संखे यांच्या महाराष्ट्र सरकार विरूध्द मुंबई उच्च न्यायालयामधील प्रदीर्घ लढयामुळे वंजारी समाज ओ.बी.सी. मधून एन.टी.डी मध्ये वर्गीकृत झाला.

## समारोप

भारतीय जातीव्यवस्थेतील इतर जातीच्या तुलनेत वंजारी प्रगती व्हावी तशी झालेली नाही.कारण वंजारी समाज लोकसंख्येच्या बाबतीत भटक्या–विमुक्त जाती जमातीच्या तुलनेने लोकसंख्येच्या बाबतीत जास्त आहे. परंतु मूळातच हा समाज भटका ,कष्टाळू,प्रामाणिक सरळ मार्गी असल्यामुळे स्वत:च्या सुधारणेसाठी आक्रमक,संघर्षात्मक व डावपेचात्मक स्वरूपाची भूमिका घेत नाही.स्वातंत्र्याच्या ७१ वर्षा नंतर ही या समाजाची घरे डोंगरदऱ्यात दुर्गम भागात आढळतात.शहरी भागात हा समाज कमी प्रमाणात आढळतो.वंशपरंपरेनुसार वंजारी समाज हा भटका(एन.टी.डी) समाज म्हणून ओळखला जातो.या समाजाचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे.त्यांची शेती हलक्या प्रतिची व पारंपारिक असल्यामुळे मागासलेली आहे.त्यामुळे हा समाज आजही मोठया प्रमाणात दारिद्रयात जीवन जगत आहे.त्याचा परिणाम त्याच्या शैक्षणिक,सामाजिक, आर्थिक,राजकीय,स्थितीवर झालेला दिसतो.तसेच या समाजात निरक्षरता,धार्मिकता,दैववाद,देवभोळेपणा व अंधश्रध्दा असल्यामुळे बदलांना सामोरे जाण्यास अनेक अडचणी येतात.त्यामुळे या समाजातील शैक्षणिक,आर्थिक,सांस्कृतिक व राजकीय प्रगतीचा वेग मंद असल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. वंजारी भाग एक – पांडुरंग आंधळे,सुरकिर्ती प्रकाशन– नाशिक.
२. सर्वात्म वंजारी– ॲड.मायावती सोसे.
३. गोपीनाथ मुंडे आणि वंजारी समाज – जयश्री नागरे.( दिव्य मराठी १० जुलै २०१४)
४. डॉ. प्रताप चाटे – बंजारा कोण होते.( शोध निबंध )
५. आवगेहा आमारी वंजारी बोली – लोकसत्ता दिनांक ४ ऑगस्ट २०१३.
६. वंजारी समाजाचा इतिहास – प्रा. बालाजी मुसळे.